# छोटया जयदीपची अपेक्षा वाढविणारी चित्रे

(आमच्या कला-समीक्षकाकडून)

मुंबई, मंगळवार—एखाद्या सराईत चित्रकाराला साजेशा ढंगात कु. जयदीप मेहरोत्रा या बालचित्रकाराने स्वतःच्या लहान मोठया २४ चित्रांचे पहिलेच प्रदर्शन 'चेतना' आर्ट गॅलरीत भरविले आहे. सोमवारी श्री. स. का. पाटील यांनी या प्रदर्शनाचे उद्घाटन केले.

जयदीप हा १३ वर्षाचा कोवळा चित्रकार अजमेरचा. त्याचा अजमेरच्या मेयो कॉलिजात आठवीचा अभ्यासक्रम चालू असून, फावल्या वेळात चित्रकलेकडे लक्ष केंद्रित करण्याची आवड दांडगी आहे. सध्याचे प्रदर्शन हे गेल्या १॥-२ वर्षांत चितारलेल्या चित्रांचे असून रसिकांनी त्याचा अवश्य लाभ घ्यावा, असे आहे.



कु. जयदीप

"पुढे इंजिनीयर होण्याची महत्त्वाकांक्षा.परंतु आईकडून मिळालेल्या कलेच्या वारशाचा स्वतःच्या कल्पना रंगविण्यासाठी उपयोग करण्याचा हव्यास. शिवाय त्यातून मिळणारा आनंद काही औरच असतो"—इति जयदीप.

सर्वच दृष्टीनी क्र. २० (विच् क्रॅफ्ट) हे चांगल्यापैकी साधलेले चित्र असून, रंगांचा सफाईदार वापर, विशेषतः पिवळ्या रंगाची ठेवण आणि रेखाटन या सर्वच गोष्टी चित्राला उठाव आणतात. क्र. ६ (मीटिंग) आणि क्र. २२ (फ्लॉवर अॅरेंजमेंट) ह्या दोन चित्रांतील निळ्या रंगाचा जोमदारपणे केलेला वापर मनाची पकड घेतो. क्र. ३ (हॉर्स) मधील लयबद्ध रेखाटन आणि क्र. ९ (ऑफ्रिकन ड्रमर) यांतील ब्लेडच्या सहाय्याने केलेले हळुवार रेखाटन विशेष नजरेत भरते. क्र. १७ (एल्. एस्. डी.) मध्ये पिवळ्या रंगाचा पोत चांगल्या प्रकारे सांभाळला आहे. परंतु क्र. ५ (लेडी इन दि मून लाईट) आणि क्र. २१ (दि लॅम्प) मध्ये करण्यात आलेला निळ्या रंगाचा वापर योग्य असूनहि, तो मनाला समाधान देऊ शकत नाही. जयदीपने कल्पनेने रंगविलेला



कु. जयदीपचा घोडा

'पिकासो' (क्र. १३) हे एक जादा आकर्षण आहे.

जयदीपच्या कोवळ्या मनावर उमटलेल्या "कल्पना" प्रत्यक्ष कॅनव्हासवर साकार झालेल्या पाहताना त्याच्याबद्दलच्या भविष्यातील अपेक्षा उंचावल्याशिवाय राहत नाहीत.

प्रदर्शन ७ जुलैपर्यंत उघडे आहे.

महाराष्ट्र टाइम्स

मुंबई, बुधवार, ३ जुलै १९६८